# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990









लातूर वर्ष ४ थे अंक १८४ वा रविवार दि.०५ जानेवारी २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## नांदेडातील बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपींची निर्दोष सुटका



नांदेड : प्रतिनिधी-संपूर्ण देशभर गाजलेल्या नांदेड शहरातील पाटबंधारे नगर येथील बॉम्बस्फोट प्रकरणात नांदेड न्यायालयाने सर्व आरोपींची शनिवारी निर्दोष मुक्तता केली. या स्फोटात दोन आरोपींचा मृत्यू झाला होता. तर दहा जणांवर खटला सुरु होता. तब्बल १९ वर्षानंतर या प्रकरणाचा निकाल लागला आहे. या निकालामुळे सीबीआयला धक्का बसला आहे.

नांदेड शहरातील पाटबंधारे नगर भागात ६ एप्रिल २००६ रोजी लक्ष्मण राजकोंडवार यांच्या घरात मोठा स्फोट झाला होता. या स्फोटात नरेश राजकोंडवार आणि हिमांशू पानसे यांचा जागीच मृत्यू झाला होता. तर मारोती वाघ, योगेश देशपांडे, गुरुराज तुप्तेवार व राहूल पांडे हे गंभीर जखमी झाले होते. तर मोठी इमारत असलेल्या घरात हा स्फोट झाल्याने घरातील साहित्य छिन्नविछिन्न झाले होते. गेल्या अनेक वर्षातील ही मोठी घटना असल्याने संपूर्ण देशभरात गाजली होती. सुरुवातीला हा स्फोट फटाक्यांचा असल्याचे मानले जात होते. परंतु दुस-या दिवशी घराची तपासणी घेतल्यानंतर हे गंभीर प्रकरण एटीएसकडे देण्यात आले.

यानंतर हा तपास सीबीआयकडे वर्ग करण्यात आला. तपासा दरम्यान आरोपींचा संबंध पूर्णा, परभणी आणि जालना येथील बॉम्बस्फोटांशी असल्याचे पुढे आले. या प्रकरणात सीबीआयने २ हजार पानांची चार्जशीट तयार केली होती. त्यात बारा जणांना आरोपी करण्यात आले होते. जिल्हा व सत्र न्या. सी. व्ही. मराठे यांनी या खटल्यात ४९ साक्षीदार तपासले. त्यात सीबीआय पाटबंधारे नगर येथील त्या घरात बॉम्बस्फोट झाल्याचे सिद्धच करु शकली नाही. त्या ठिकाणी फटाक्यांचा स्फोट झाला होता हे ग्रा धरुन न्यायालयाने सर्व आरोपींची शनिवारी ४ रोजी निर्दोष मुक्तता केली. शनिवारी या प्रकरणाचा निकाल जाहीर करण्यात आला.

खटल्यात बचाव पक्षाच्या वतीने ॲड. नितीन रुणवाल यांनी बाजू मांडली. २००६ मध्ये झालेल्या या बॉम्बस्फोटाचा निकाल तब्बर १९ वर्षानंतर लागला. यात सीबीआयने २ हजार पानांची चार्जशीट तयार करून त्यात बारा जणांना आरोपी केले होते. परंतू या सर्वांची निर्दोष सुटका केल्याने देशातील उच्च तपास यंत्रणा असलेल्या सीबीआयला मोठा धक्का बसला आहे. हा निकाल ऐकण्यासाठी न्यायालयीन परिसरात लोकांनी गर्दी केली होती. तर निकालाच्या पार्श्वभूमिवर पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त तैनात केला होता.

## प्रत्येक घराच्या सुरक्षिततेसाठी लोकप्रतिनिधींचा पुढाकार - आ.अमित देशमुख



लातूर /प्रतिनिधी :- घर बांधणे व त्याची सजावट करणे हे प्रत्येक नागरिकाचे स्वप्न असते. त्यांनी बांधलेले घर सुरक्षित ठेवून नागरिकांच्या स्वप्नांनाही सुरक्षित ठेवणे हे लोकप्रतिनिधीचे कर्तव्य असून लातूरकरांचा प्रतिनिधी म्हणून आपण त्यासाठी पुढाकार घेऊ, असे प्रतिपादान आ.अमित देशमुख यांनी केले.

रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन च्या वतीने आयोजित रोटरी बिल्ड एक्सपो २०२५ च्या उद्घाटन समारंभात आ.अमित देशमुख बोलत होते. यावेळी उमरग्याचे आमदार तथा रोटरी सदस्य प्रविण स्वामी, संभाजीनगर येथील रुद्राणी इन्फ्रास्ट्रक्चरचे संचालक विवेक देशपांडे, रोटरीचे डीजीएन जयेश पटेल, डीजीई सुधीर लातूरे, रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनचे अध्यक्ष चेतन पंढरीकर यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना आ.अमित देशमुख म्हणाले की, स्वतःचे घर बांधण्याचे स्वप्न प्रत्येक जण पाहत असतो. त्यासाठी आयुष्यभर पैसे जमा करत असतो. यातून उभारलेले घर आकर्षक पद्धतीने सजवावे यासाठीही तो प्रयत्न करतो. नागरिकांना घर बांधकाम सोपे व्हावे यासाठी विविध शासकीय परवानग्या सुलभतेने मिळाव्यात यासाठी काम करणे हे लोकप्रतिनिधी म्हणून आमचे कर्तव्य आहे. याशिवाय त्याने बांधलेल्या घराला सुरक्षितता पुरवणे हे देखील महत्त्वाचे आहे. लोकप्रतिनिधी म्हणून आपण त्यासाठी आजवर पुढाकार घेतला असून भविष्यातही त्यासाठी कटिबद्ध आहोत. घर बांधण्यासाठी नागरिकांमध्ये आर्थिक क्षमता निर्माण व्हावी, लातूरचे अर्थकारण गतिमान व्हावे, यासाठी प्रयत्नशील असून त्या अनुषंगाने लातूरचा औद्योगिक विकास करण्यासाठी प्रयत्न करू, असे आश्वासनही आ.अमित देशमुख यांनी दिले. लातूरकरांची गरज ओळखून रोटरीच्या वतीने राबविण्यात आलेल्या बिल्ड एक्सपो या उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले.

आ.प्रविण स्वामी यांनी शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या लातूरच्या विकासात विविध समाज घटकांचा सहभाग असल्याचे मत व्यक्त केले.

रुद्राणीचे विवेक देशपांडे यांनी लातूरच्या विकासाची जडणघडण आणि त्यातील बांधकाम क्षेत्राचा सहभाग याचे विवेचन करताना स्व.विलासराव देशमुख यांच्या दूरदृष्टीच्या धोरणांचा लाभ झाला असल्याचे सांगितले.लातूरच्या नेतेमंडळींनी घेतलेल्या निर्णयामुळे शहर आज गतीने वाटचाल करत आहे. दूरदृष्टीच्या धोरणांचा वारसा अमित देशमुख चालवत आहेत. लातूरचा विकास होत असताना बांधकाम क्षेत्रही त्यात मागे नाही. लातूरकरांनी नेहमीच नव्याचा स्वीकार केला आहे. त्या अनुषंगाने बांधकाम क्षेत्रातही बदल घडत आहेत. याचा फायदा सर्वांनाच होणार आहे. रोटरीने लातूरकरांच्या गरजा ओळखत हा उपक्रम राबविला असून शहरातील सामान्य नागरिकाच्या स्वप्नपूर्तीसाठी पुढाकार घेतला असल्याचे ते म्हणाले.सामान्य नागरिकांना बांधकाम क्षेत्रातील नव्या वस्तू व तंत्रज्ञानाची माहिती या माध्यमातून उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांनी रोटरीचे आभार मानले.

जयेश पटेल यांनी रोटरीमार्फत कर्करोग व पोलिओ या आजारावर मात करण्यासाठी केल्या जाणाऱ्या कार्याची माहिती दिली.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते रोटरी बिल्ड एक्सपोचे उद्घाटन संपन्न झाले. प्रोजेक्ट चेअरमन अमोल दाडगे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचलन डॉ.पुरुषोत्तम दरक तर गिरीश पेन्सलवार यांनी आभार प्रदर्शन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पवन मालपाणी, कलश मुंदडा, अनुप देवणीकर, श्रवण बियाणी,अमोल बनाळे, वीरेंद्र फुंडीपल्ले यांच्यासह रोटरीच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

या कार्यक्रमास डॉ.मायाताई कुलकर्णी,डॉ. सोपानराव जटाळ यांच्यासह रोटरी सदस्य तसेच शहरातील डॉक्टर, मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोमवार दि. ६ जानेवारी पर्यंत चालणाऱ्या या बिल्ड एक्सपोमध्ये रोटरीच्या वतीने घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेचे पारितोषिक वितरण तसेच व्होकेशनल अवॉर्ड वितरण व अन्य कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात आले आहे.

## किनवट शहर मध्ये राष्ट्रीय महामार्गाच्या कामाला सुरुवात; पण रुंदीत तफावत

**:सुरुवातीपासूनच हा महामार्ग वादाच्या भोवऱ्यात अडकला. इकडे कोणाचेही लक्ष गेले नाही. त्यामुळे किनवटकरांना तब्बल सात वर्षांपासून धुळीचा सामना करत मार्गक्रमण करावे लागले.आताही रुंदीच्या बाबतीत कोणीही बोलायला तयार नाही. हे पाहून किनवटच्या व्हाइस ऑफ मीडिया किनवट शाखेने सहा. जिल्हाधिकारी किनवट यांना निवेदन देऊन रखडलेल्या राष्ट्रीय महामार्गाचे काम मार्गी लावावे, अशी मागणी करणारे निवेदन दिल्यानंतर कामाच्या हालचालींना वेग आला. मात्र रुंदीत तफावत असल्याने हा महामार्ग आगामी काळात डोकेदुखीचा ठरणार असल्याचे बोलले जात आहे.**

किनवट/शेख शौकत :-शहरातून जाणाऱ्या व शहराच्या वैभवात भर घालणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाच्या कामाला किनवटमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते जिजामाता चौकापर्यंतच्या कामाला सुरुवात झाली आहे. जेवढी जागा उपलब्ध तेवढ्याच रुंदीत हा राष्ट्रीय महामार्ग बनवला जात आहे. ३० मीटर रुंदीऐवजी आता कोर्टाने १८ मीटर रुंद काम करण्याचा आदेश दिलेला असताना त्यातही काटकसर केली जात आहे. नाव राष्ट्रीय महामार्ग रुंदी मात्र कमी? डिव्हायडर नसल्याने सुसाट वेगाने धावणारे वाहने एकमेकांना भिडून अपघात होतील, अशी भीती व्यक्त केली जात आहे. नांदेड, भोकर, हिमायतनगर, किनवट, माहूर, धनोडा राष्ट्रीय महामार्ग क्र. १६१ ए किनवट शहरातून जात असल्याने किनवटच्या वैभवात भर पडली जाणार होती. पण रुंदीत तफावतच तफावत असल्याने महामार्गाची पुरती वाट लागली आहे. किनवट शहरात आयेप्पा स्वामी मंदिर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या एक किलोमीटर लांबीच्या महामार्गावर ३० मीटर रुंदीचा महामार्ग असून, केवळ चारशे मीटर लांबीचा महामार्ग ३० मीटर रुंदीचा बनला आहे. त्यापुढे बसस्थानक व त्यापुढे महामार्गाची रुंदी ३० मीटरपेक्षा कमी करण्यात आली. किनवट बसस्थानकाजवळ ३० मीटर रुंद महामार्ग करण्याला स्कोप होता. पण राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने ३० मीटर रुंदीऐवजी पंचवीस सव्वीस मीटर रुंद करून मोकळा होणे पसंद केले आहे. त्यापुढे म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते जिजामाता चौक या महामार्गाच्या रुंदीत कमालीची तफावत पहावयास मिळत आहे. आयेप्पा स्वामी मंदिर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकापर्यंत महामार्गावर बसस्थानक असल्याने मोठी वर्दळ असते या महामार्गाला जोडणारे एक नव्हे दोन नव्हे ११ अप्रोच (जोड) जोडलेले आहेत. यू टर्न घेताना कधीही कोणतेही वाहन एकमेकांना धडकून अपघात होण्याची भीती आहे.


## माजी मंत्री आ. अमित देशमुख यांच्या सूचनेनुसार बाळू डोंगरे यांच्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी केशवराज शाळेने स्वीकारली

लातूर / प्रतिनिधी :- लातूर शहरातील आयकॉन या खाजगी हॉस्पिटल मध्ये काम करणाऱ्या स्व. बाळू डोंगरे या कर्मचाऱ्याचा खून झाला आहे, राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी नुकतेच त्यांच्या घरी जाऊन त्यांच्या कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेऊन त्यांना धीर दिला होता, त्यांच्या घरानजीक असलेल्या केशवराज विद्यालयाने त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी पालकत्व स्वीकारावे, अशी विनंती संबंधित मुख्याध्यापकांकडे करण्यात आली होती. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते बाळू डोंगरे यांची मुले रुद्राली बाळू डोंगरे इयत्ता ३ री व उत्कर्ष बाळू डोंगरे इयत्ता १ ली यांची शिक्षणाची जबाबदारी केशवराज शाळेने स्वीकारल्याचे पत्र भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यवाहक यांनी दिले आहे, रुद्राली (ई.३ री) व उत्कर्ष बाळू डोंगरे (ई. १ ली) यांच्या दहावीपर्यंतच्या शिक्षणाची जबाबदारी केशवराज विद्यालयाने घेतल्याची माहिती या पत्रात देण्यात आली आहे. शनिवार दिनांक ४ जानेवारी रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी बाळू डोंगरेचे आई प्रेमा डोंगरे, वडील भारत डोंगरे, पत्नी छाया डोंगरे यांना पत्र देण्यात आले. यावेळी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यवाह शैलेश कुलकर्णी, केशवराज शाळेचे मुख्याध्यापक विष्णू सोनवणे, महादेव ढमाले, व्यंकटेश पुरी आदी उपस्थित होते.



## समाजाने वैचारिक मरगळ झटकून टाकावी. - डॉ.जयद्रथ जाधव यांचे प्रतिपादन

लातूर :- प्राचीन आणि अर्वाचीन काळापासून भारतीय समाजात प्रबोधन परिवर्तनाचा विचार संत,महापुरूषांनी दिला. वर्ण-वर्ग-जातीप्रधान भारताला प्रबोधनाचा विचार देऊन समग्र भारतीयांना एका सुत्रांत बांधण्याचे कार्य महापुरुषांनी केले.पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि समान न्याय हा मूल्य प्रणित स्वातंत्र्याचा विचार मजबूत करून अठरा पगड जातीबांधवांना न्याय दिला. संविधानात अंतर्भूत करण्यात आलेल्या या आदर्श मूल्यांमुळे या देशातील दलित, शोषित, पीडित, बहुजन समाज व स्त्रियांची खरी उन्नती झाली. महापुरुषांच्या या धुरंदर कार्याला आज खूप मोठा काळ लोटला आहे. आपल्याला मिळालेले हे स्वातंत्र्य शतकाकडे वाटचाल करीत असताना समाजात एक प्रकारची मरगळ आलेली आहे. सद्यस्थितीत ही मरगळ झटकून भारतीय समाजाने पुन्हा एकदा संघटित होऊन देशाला एकसंघ ठेवले पाहिजे. असे विचार १ जानेवारी २०२५ रोजी 'स्त्री मुक्ती दिन व भीमा कोरेगाव शौर्य दिना'निमित्त भारतीय बौद्ध महासभा लातूर जिल्हा पश्चिम,लातूर तालुका व महिला शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने मूलगंध कुटी बुद्ध विहार सुभेदार रामजी नगर, लातूर येथे




आयोजित करण्यात आलेल्या सामाजिक परिवर्तनाचा विचार आणि समकालीन वास्तव या विषयावरील व्याख्यानाच्या कार्यक्रमात समीक्षक व शिवाजी महाविद्यालय रेणापूर येथील मराठी विभाग प्रमुख डॉ.जयद्रथ जाधव यांनी केले.सामाजिक व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभेचे लातूर जिल्हा पश्चिम विभागाचे अध्यक्ष आयु. एम.एम बलांडे यांची उपस्थिती होते. तर यावेळी मंचावर भारतीय बौद्ध महासभा लातूर जिल्हा पश्चिम विभागाचे सरचिटणीस आयु.अशोक शिंदे, महिला विभागाचे अध्यक्ष आयुनि. शारदाताई हजारे,लातूर तालुका अध्यक्ष आयु. दत्तात्रय भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती. आपल्या व्याख्यानातून डॉ.जयद्रथ जाधव पुढे म्हणाले की, हजारो वर्ष लोकांच्या मनात भरलेली विषमता, गुलामगिरी आणि स्त्री-शुद्रांचा मानवाधिकार नाकारणारा मनुस्मृति हा ग्रंथ असून त्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रतीकात्मक पद्धतीने दहन केले. या एका क्रांतिकारी घटनेतून देशातील विषम धर्मव्यवस्थेला धक्का देऊन त्यांनी समतेचे पाऊल टाकले.

१ जानेवारीला होणारा भीमा कोरेगाव शौर्य दिन हा या देशातील तमाम आंबेडकरी समाजाची अस्मिता आहे.अखंड समाजाच्या पराक्रमाची ती गाथा आहे. आजचे वर्तमान सामाजिक, राजकीय,धार्मिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या अत्यंत एककल्ली दिसून येते आहे. आज फुकटची अनुदान संस्कृती फोफावली आहे.पण यातून लोककल्याण,लोकहक्काची जपणूक होत नाही. अनुदान संस्कृती समाजाला निष्क्रिय व लाचार करते. त्यामुळे समाजाचे जगणे संकुचित होत आहे. समाजात जातीय आणि धार्मिक ध्रुविकरण गतीने वाढत आहे. त्यातूनच समाज आणि राजकारणातील नैतिकता संपुष्टात येत आहे. लोकशाही बहुमताच्या सामर्थ्यावर अनेकांच्या मानवी अधिकारावर गंडांतर आणले जात आहे.वसुधैव कुटुम्बकमचा घोषणा जी २० च्या बैठकीत दिला खरा.परंतु भारतात अंतर्गत वसुधैव कुटुंबकम दिसून येत नाही. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक लोकशाहीचा व महात्मा गांधींच्या अहिंसक आणि विकेंद्रीत लोकशाहीचा विचार आजच्या राजकारणातून हद्दपार होत आहे. त्यामुळे सद्यस्थितीत वर्तमानात परिवर्तनाचा विचारच हळूहळू संपुष्टात येत आहे की काय अशी शंका यावी अशी वर्तमानात स्थिती आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयु.अशोक शिंदे यांनी केले अध्यक्षीय मनोगत आयु. एम. एम.बलांडे यांनी माडले, सूत्रसंचालन हणमान कांबळे यांनी केले. तर आभार आयु. हिराचंद गायकवाड यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.लहू वाघमारे,आयु. प्रसेनजित जोगदंड,आयु.गोरोबा कांबळे,आयु.बळीराम लोकरे ,भीमराव साबळे , शुभम कांबळे, दिग्गज वाघमारे आणि अभिजीत कोकाटे यांनी परिश्रम घेतले.

## संपादकीय....

# भारतीय अर्थव्यवस्थेवर गुंतवणूकदारांचा विश्वास

केंद्र तसेच राज्य सरकारने कार्यकाळाच्या पहिल्या वर्षात कोणकोणत्या क्षेत्रात काय करायचे आहे, हे पक्के ठरवलेले आहे. काही क्षेत्रांचा आढावा घेतला जात असून, त्यानुसार कोणकोणत्या सुधारणा करायच्या याची व्यूहरचना ठरवली जात आहे. सर्वात महत्त्वाच्या पायाभूत क्षेत्रांची वाढ गेल्या वर्षभरात सुमारे निम्म्यावर आली आहे. नैसर्गिक वायूचे उत्पादन कमालीचे घटले आहे, तर रिफायनरी उत्पादने, खते, पोलाद आणि वीजनिर्मिती या क्षेत्रांची वाढ अनुक्रमे दोन ते पावणेपाच टक्के राहिली आहे. देशातील निर्मिती क्षेत्राच्या सक्रियतेचा वेगही कमालीचा घसरला आहे. या क्षेत्राला सध्या फारशा नवीन ऑर्डर्स मिळत नाहीत आणि त्यामुळे उत्पादन विस्तारही घटला आहे. स्पर्धा आणि किमतीच्या वाढत्या दबावाचा फटका निर्मिती क्षेत्राला बसला आहे. डॉलरच्या तुलनेत रुपयाने तर ८५.८१ पर्यंत घसरणीची ऐतिहासिक पातळी गाठली आहे. आयातदारांकडून डॉलरची मोठी मागणी आणि विदेशी निधीचे अविरत निर्गमन सुरू असल्याने रुपयाच्या मूल्यावर ताण आला आहे. रिझर्व्ह बँक तसेच सरकारी बँकांकडूनही रुपयाला सावरण्यासाठी डॉलरची विक्री करून चलन बाजारात हस्तक्षेप सुरू आहे. डॉलर खरेदी-विक्रीच्या स्वॅपचे व्यवहार केले जात आहेत, तरीही घसरगुंडी टाळणे शक्य झालेले नाही; पण गुरुवारी सेन्सेक्सने १४३६ अंकांची भरारी घेऊन, नव्या वर्षास प्रचंड उत्साहाने सलामीच दिली. आता सेन्सेक्स ७९९४३ वर जाऊन पोहोचला आहे, तर निफ्टीमध्ये ४४५ अंकांची वाढ होऊन, तो २४१८८ या पातळीपर्यंत पोहोचला आहे. डिसेंबर २०२४ मध्ये संपलेल्या वर्षात माहिती-तंत्रज्ञान कंपन्यांची कामगिरी समाधानकारक राहिली. बँकिंग आणि आयटी क्षेत्रातील कंपन्यांचे शेअर्स तर भराभर चढत आहेत. या पार्श्वभूमीवर, देशांतर्गत बाजारपेठेत उत्साहाचे वातावरण आहे.

एकाने अमुक कंपनीचे समभाग खरेदी केले, तर झुंडीने अन्यही लोक ते समभाग खरेदी करतात. शिवाय आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील घडामोडी, भारताचे अन्य देशांसोबतचे संबंध सुधारत आहेत की बिघडत आहेत, तसेच देशातील सरकारची धोरणे आणि खासगी क्षेत्राची कामगिरी हे बघूनच गुंतवणूकदार खरेदी-विक्रीचे निर्णय घेत असतात. रुपया घसरल्यामुळे आयटी कंपन्यांना अधिक चालना मिळणार आहे. तसेच ज्या ज्या क्षेत्रांचे स्वरूप निर्यातप्रधान आहे, त्यामधील कंपन्यांना बरकत येण्याची शक्यता आहे. कारण, रुपया उतरल्यामुळे आपला माल निर्यातीच्या संदर्भात स्पर्धाशील राहतो. वाहनांच्या एकूण मागणीत १४ टक्क्यांची वाढ झालेली आहे. वित्तीय क्षेत्रातील कंपन्यांचा व्यवसायही बहरत असून, चालू वर्षातील तिसर्या तिमाहीत त्यांना भरघोस फायद्याची अपेक्षा आहे. डिसेंबरमधील जीएसटीचे संकलनही ७ टक्क्यांनी वाढून, १ लाख ७७ हजार कोटी रुपयांवर गेले आहे. लवकरच जीएसटी कौन्सिलची बैठक होणार असून, त्यावेळी घड्याळे, पादत्राणे, गारमेंटस्, शीतपेये, तंबाखू यावरील जीएसटीचे दर वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे सरकारच्या वार्षिक महसुलात २२ हजार कोटी रुपयांची भर पडू शकेल. देशातील रोजगारामध्ये पुढील वर्षी ९ टक्के वाढ अपेक्षित आहे. त्यात माहिती-तंत्रज्ञान, रिटेल, दूरसंचार, बँकिंग, वित्तीय सेवा व विमा या क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या जास्त संधी निर्माण होतील, असा अंदाज 'फाऊंड इट' या रोजगार व गुणवत्ता मंचाच्या ताज्या अहवालात व्यक्त केला आहे. नवीन तंत्रज्ञान व उदयोन्मुख व्यवसाय हे देशातील रोजगाराच्या बाजारपेठेला सध्या आकार देत आहेत. एज कॉम्प्युटिंग, क्वांटम ॲप्लिकेशन्स आणि सायबर सुरक्षा यातील नावीन्यपूर्ण संशोधनामुळे निर्मिती, आरोग्य सुविधा आणि माहिती-तंत्रज्ञान क्षेत्राचे स्वरूपच पालटणार असल्याचे एकूण चित्र दिसत आहे.

देशातील रिटेल मीडिया नेटवर्कची वाढ होत असून, कृत्रिम प्रज्ञाआधारित मूल्यांकनामुळे ई-कॉमर्स, मनुष्यबळ आणि डिजिटल सेवा या क्षेत्रांतील गुणवत्तेच्या गरजा बदलणार आहेत. त्यामुळे डिजिटल मार्केटिंग, जाहिरात व्यवस्थापन आणि मनुष्यबळाचेच मूल्यांकन करू शकणार्या कुशल कर्मचार्यांना प्राधान्य मिळणार आहे. बेरोजगारीबाबत ओरड होत असताना केवळ महाराष्ट्राचाच विचार करता गडचिरोलीसारख्या मागासलेल्या जिल्ह्यात ६,२०० कोटी रुपयांची गुंतवणूक झाली असून, अलीकडील काळात ९ हजार लोकांना रोजगार मिळाला आहे. तेथे आणखी २५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होऊन २० हजार स्थानिकांना रोजगार मिळणार आहे. गडचिरोलीत विमानतळ होत असून, समृद्धी महामार्गामुळे हा जिल्हा मुंबईसही जोडला जाणार आहे. तसेच केंद्र सरकार आणि नीती आयोगाच्या शिफारसीनुसार, मुंबई महानगर प्रदेशचा आंतरराष्ट्रीय दर्जाचे आर्थिक केंद्र म्हणून विकास करण्यासाठी एमएमआरडीएने प्रारूप आराखडा तयार केला आहे. तेथे गृहनिर्माण, बंदरविकास, पायाभूत सुविधा, सेवाक्षेत्र यामध्ये नवनवीन लोकांना काम मिळणार आहे.

या क्षेत्रात २०४७ पर्यंत दोन कोटी रोजगारनिर्मितीचे उद्दिष्ट असून, त्यापैकी ३० लाख संधी २०३० पर्यंतच उपलब्ध करून देण्याचे लक्ष्य ठेवले आहे. थोडक्यात, देशातील नवतंत्रज्ञान क्षेत्रातील उद्योग व रोजगार यांची स्थिती दिवसेंदिवस सुधारत आहे. त्यातच गेल्या वर्षात राष्ट्रीय शेअर बाजार, म्हणजेच एनएसईने २ कोटी ३३ लाख नवीन गुंतवणूकदारांची भर घातली आहे. शेअर बाजाराबद्दल एक सकारात्मक जाणीवजागृती झाली आहे. उत्तर प्रदेशातील नवगुंतवणूकदारांमध्ये सर्वाधिक, म्हणजे ३३ टक्के इतकी वाढ झाली आहे. केवळ २०२४ या एका वर्षातच तेथील ३३ लाख लोकांनी शेअर बाजारात प्रवेश केला आहे. शेवटी वाढत्या बचतीमधूनच उद्योग-व्यवसायांना भांडवल मिळते आणि विकासाला चालना मिळत असते. बाजारात नेहमीच चढ-उतार होत असतात. गुरुवारी भरारी घेतल्यानंतर शेअर बाजार शुक्रवारी मात्र ७२० अंकांनी घसरला. याचे कारण अचानकपणे कच्च्या तेलाचे भाव वाढले.

# लाडकी बहिण योजनेबाबद आताच छाननी का! निवडणुकी आधी का नाही!

कोणतीही योजना राबवितांना त्याचा सखोल अभ्यास करायचा असतो व नंतर त्याची पडताळणी करून अमलात आणायची असते.परंतु सरकारने राजकीय हेतू लक्षात घेऊन निवडणुकीचे मोठे शस्त्र म्हणून लाडकी बहिण योजना अंमलात आणली व लाभार्थींनी त्याचा पुर्णपणे लाभ सुध्दा घेत आहे आणि राज्याला पुर्ण बहुमताचे सरकार बहाल केले.परंतु या योजनेमुळे सरकारला घाटा सहन करावा लागणार आहे व याचा परिणाम सरकारी तिजोरीवर पडणार ही बाब लक्षात घेता सरकार अनेक निकष लावून त्याची छाननी करून जीतक्या लाडक्या बहीणी लाभार्थी या योजनेतुन कमी करता येईल तीतक्या कमी करण्याच्या तयारीत सरकार असल्याचे दिसून येते.यासाठी सरकार प्राप्तीकर विभागाची (इन्कम टॅक्स विभागाची)मदत घेतली जाणार आहे. अडीच लाखांपेक्षा जास्त उत्पन्न, कुटुंबात चारचाकी गाडी असेल अशा महिलांना आता या योजनेचा लाभ मिळणार नाही याची दाट शक्यता आहे. विधानसभा निवडणुकी आधी सरकारने लाडकी बहिण योजना अंमलात आणली याचे स्वागत सर्वच स्तरातून झाले हि बाब निवडणुकीच्या निकालानंतर दिसून आले. परंतु आज निवडणूका संपल्या नंतर लाडकी बहिण योजनेतील लाभार्थी महिलांची छाननी करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे ही अत्यंत दुर्दैवी व गंभीर बाब आहे. कारण निवडणुकीच्या आधीपासून या योजनेचा लाभ महिला घेत आहे.त्यामुळे आता प्रश्न निर्माण होतो की जेव्हा महिलांनी लाडकी बहिण योजनेचे फॉर्म सरकारी यंत्रणेच्या माध्यमातून भरल्या गेले.तेव्हाच सरकारने महीलांच्या फॉर्मची, त्यांच्या घराची,अडीच लाख पेक्षा जास्त उत्पन्न,चारचाकी वाहन,घर, बंगला आहे किंवा नाही, टीव्ही, फ्रीज या संपूर्ण बाबींची चौकशी का केली नाही.सरकारला आताच कशी काय लाडकी बहिण योजनेच्या निकषाची गरज भासली!यावरून स्पष्ट होते की सरकारच्या तिजोरीत ठणठणाट आहे.लाडकी बहीण योजना जशी लागु केली तशीच सुरू ठेवायला पाहिजे. कारण लाभार्थीसह अनेक लाडक्या बहीणींनी सरकारला एकतर्फी मतदार करून भरघोस मतांनी सत्तेच्या खुर्चीवर बसले आणि आता सरकार अचानक छाननी करून काही निकष लावत असेल तर हा लाडकी बहिण योजनावर घोर अन्याय समजण्यात येईल.कारण सुरूवातीला कोण गरीब आहे किंवा कोण श्रीमंत आहे किंवा कोण इन्कम टॅक्स पे आहे याची कोणीच तिळमात्र चौकशी केली नाही.कारण सर्वांना निवडुन यायचे होते आणि आता निवडुन आल्यानंतर छाननीची भाषा करून निकष लावने म्हणजे लाडक्या बहीणींना निराश करून त्यांना होत असलेली मदत हीरावल्या सारखे होईल. सरकारमार्फत असेही सांगण्यात येते की लाडक्या बहीणींची सरसकट छाननी नाही.परंतु मी म्हणतो की आपण जशी योजना अंमलात आणली तशीच सुरू ठेवायला पाहिजे यात सरकारला काय अडचण! लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी, आजी माजी आमदार-खासदार मंत्री, यांना दर महिन्याला वेतन, पेंशन,भत्ते व इतर सुविधा सुरळीत मिळते मग सरकारचे १५०० किंवा २१०० रूपयांची लाडक्या बहीणींना सरसकट मदत दिली तर यात सरकारचे काय नुकसान होणार आहे. कारण कोणत्याही महीलांनी किंवा संघटनांनी लाडकी बहिण योजनेची मागणी केलेली नव्हती.हि योजना सरकारने अंमलात आणली आणि सुरूही केली त्याच पध्दतीने पुढेही ठेवली पाहिजे व आणखी लाभार्थींना समाविष्ट केले पाहिजे. सरकारने एकतर योजना आनु नये आणली तर त्याची वचनपुर्ती पुर्ण केली पाहिजे.त्यामुळे सरकारने कोणतीही योजना अंमलात आणायच्या अगोदर त्याचा सखोल अभ्यास करायला हवा नंतरचं ती अमलात आणायची की नाही याचा विचार करायला हवा.आता असे झाले की योजना तर अंमलात आणली याची भरपाई काढण्यासाठी अनेक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात कर सुध्दा वाढविण्यात आले सोबतच महागाई भरमसाठ वाढतच आहे. परंतु त्यानेही काम भागत नसल्यामुळे आता लाभार्थी महीलांची छाननी करून त्यातून जास्तीत जास्त लाभार्थी महीला कशा कमी करता येईल याकडे सरकारचे लक्ष लागल्याचे दिसून येते.त्यामुळे आज लाडकी बहिण योजनेतील लाभार्थी महीला द्विधेमध्ये असल्याचे दिसून येते.या योजनेतील लाभार्थींची छाननी म्हणजे या योजनेवर घोर अन्यायच म्हणावा लागेल.जय हिंद!

-------------------

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# ओढ लागली माझ्या मना...

नवीन वर्षाचा ओनामा होते न होते तेच आजच्या युवकांना ओढ लागते ती प्रेम सप्ताह म्हणजेच व्हॅलेंटाईन वीकची...नववर्षाचा पहिला महिना कधी संपतो नि कधी दुसरा महिना सुरु होतो असं वाटायला लागतं. हा महिना सुरु झाला तरी सुरुवातीचे ७ दिवस काढणं खूप अवघड वाटू लागतं. जेव्हा ७ फेब्रुवारीचा सूर्योदय होतो, तेव्हा कुठे जीवात जीव येतं नि १४ फेब्रुवारीला मात्र अख्ख जग जिंकल्याची अनुभूती देऊन जातो.

प्रेम ही एक सुंदर अशी भावना आहे. जीवनात फार कमी लोकांना प्रेमाचे स्वरूप कळते आणि त्याचा आनंद घेता येतो. कारण प्रेमासाठी मन आणि हृदय स्वच्छ असणं खूप गरजेचं आहे. प्रेम म्हणजे नेमकं काय हे समजावून सांगणे कठीण आहे, प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या अनुभवानुसार आणि समजनुसार त्याची व्याख्या करतो. त्यामुळे प्रेमाची परिभाषा व्यक्तिपरत्वे बदलत असली तरीही मात्र त्याचा मूळ एकच असावा. प्रेम कधी व्यक्त करायचे याच्या संदर्भात काही गोष्टी निश्चित आहेत.

प्रत्येक व्यक्ती जीवनात एकदा तरी प्रेमात पडतोच. प्रेमात पडल्यानंतर आपली भावना समोरच्या व्यक्तीसमोर कशी व्यक्त करायची असा प्रश्न अनेकांना पडतो. अशा वेळी मनात असते ती फक्त भीती आणि संभ्रम... आजच्या काळात प्रेम व्यक्त करण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतींचा अवलंब केला जातो. प्रेम व्यक्त करण्याचा क्षण दोघांच्याही कायम स्मरणात राहावा यासाठी काही तरी हटके करण्याचाही काही जण प्रयत्न करतात.

कुणी आवडू लागल्यावर लगेच आपल्या भावना शेअर करणे हे फक्त चित्रमटांमध्येच छान वाटते. परंतु प्रत्यक्षात तसे करणे अजिबात चांगले नसते. आपले प्रेम जाहीर करण्यापूर्वी कमीतकमी ४-५ महिने एकत्र घालवणे आणि ७-८ वेळा सिरीयसली बोलणे महत्त्वाचे असते. कारण एवढा वेळ एखाद्याला वरवर समजून घेण्यासाठी पुरेसा असतो. जो रिलेशनशिप मध्ये येण्यापूर्वी जाणून घेणे महत्त्वाचे असते.

काही जण प्रेम व्यक्त करण्यासाठी व्हॉट्सॲप किंवा अन्य मॅसेजिंग ॲप्सचा आधार घेतात. यामुळे प्रेम व्यक्त करणं सोपं जात असलं तरी त्या क्षणाची लिखित स्वरूपात आठवण कायमस्वरूपी आपल्या जवळ राहत नाही. त्यामुळे प्रेमाची भावना व्यक्त करण्यासाठी टेक्नोलॉजीचा वापर करण्यापेक्षा पारंपरिक कागद-पेनाचा वापर करावा. प्रेमाची भावना कागदावर व्यक्त करण्याचे अनेक फायदे आहेत.

एखाद्या व्यक्तीला पाहिल्यानंतर आवडणे हे अगदी सामान्य आहे. कारण या काळात आपण केवळ त्याचे बाह्य सौंदर्य पाहत असतो. हे एक आकर्षण आहे ज्याला ब-याचदा लोकं प्रेम समजण्याची चूक करतात. अशा परिस्थितीत एखाद्याला आय लव्ह यू म्हणण्याची ती योग्य वेळ नव्हे. जेव्हा केव्हा तुमच्या मनात एखाद्याबद्दल ही भावना असेल, तेव्हा काही दिवस थांबावं आणि स्वतःला विचारावं की तुम्ही प्रेम व्यक्त करण्यात घाई तर करत नाही आहे ना!

प्रेम ही सर्वांत खास अशी भावना असते. एखाद्या व्यक्तीवर प्रेम जडल्यानंतर ते व्यक्त करणं अनेकांना काहीसं अवघड जातं. अगदी सोप्या पद्धतीनं प्रेम व्यक्त करण्यासाठी मॅसेजिंग ॲप्सचा वापर केला जातो. यामुळे तो क्षण साजरा होतो; पण मॅसेज कायमस्वरूपी राहत नाही. डिलीट झाल्याने किंवा अन्य काही कारणाने हा मॅसेज आपल्याला परत सापडतोच असं नाही. शिवाय त्याचे दुष्परिणाम देखिल पहायला मिळतात. त्यामुळे कागदावर मॅसेज लिहून खास व्यक्तीकडे आपलं प्रेम व्यक्त करणं केव्हाही चांगलं ठरतं. जेव्हा आपण एखादी गोष्ट कागदावर लिहितो तेव्हा त्या गोष्टीची जाणीव आपलं मन आणि मेंदूला असते. त्यामुळे बोलून किंवा मॅसेज करून नाही, तर कागदावर लिहून प्रेम व्यक्त करावं. लेखन आणि वाचनाचा प्रभाव आपल्या मेंदूवर दीर्घ काळ राहतो. त्यामुळे तुम्ही प्रेम व्यक्त करण्याचा विचार करत असाल, तर मनातली भावना लिहून व्यक्त करावी.

एकटेपणा दूर करण्यासाठी प्रेम व्यक्त करू नये. नात्यामुळे एकटेपणा दूर होतो. पण एकटेपणा टाळण्यासाठी एखाद्यासोबत प्रेमाचे नाते सुरु करणे ही चांगली कल्पना नाही. कारण अशा परिस्थितीत अनेक वेळा आपण चुकीची निवड करतो आणि एक समस्या टाळण्यासाठी आपण स्वतःला दुस-या समस्येला सामोरे जातो.

प्रेमाविषयी लिहिताना तुम्ही तुमचा प्रियकर किंवा प्रेयसीविषयी विचार करता. यामुळे चांगल्या क्षणांच्या आठवणी ताज्या होतात. त्यामुळे तुम्ही अधिक चांगल्या पद्धतीने आपली भावना लिहू शकता. जेव्हा तुम्ही तुमचा प्रियकर किंवा प्रेयसीकडे प्रेमभावना व्यक्त करण्यासाठी लिहू लागता, तेव्हा तुमच्या डोक्यात अनेक गोष्टी असतात. या सर्व गोष्टी तुम्ही बोलून किंवा मॅसेजच्या माध्यमातून व्यक्त करू शकत नाही. त्यामुळे प्रेमाची भावना कागदावर उतरवणं केव्हाही चांगलं ठरतं. जेव्हा तुम्ही तुमची प्रेम भावना कागदावर उतरवू लागता, तेव्हा तुम्ही तुमचा प्रियकर किंवा प्रेयसीविषयी विचार करू लागता. यामुळे त्या खास व्यक्तीशी निगडित क्षण तुमच्या डोळ्यासमोर येतात. अशा वेळी प्रेमाविषयी लिहिणं सोपं जातं आणि नेमक्या भावना कागदावर उतरतात.

पूर्वीच्या काळी कबुतरामार्फत प्रेमाचा संदेश पाठवला जायचा. हा अनुभव खूपच रोमांचक असायचा. नंतरच्या काळात पत्राच्या माध्यमातून प्रेमभावना संबंधित व्यक्तीपर्यंत पोहोचवल्या जायच्या. हे पत्र तो किंवा ती वारंवार लपून वाचत असे. यामुळे प्रेमाची सुंदर भावना मनात दीर्घ काळ कायम राहत असे. त्यामुळे प्रेम व्यक्त करण्यासाठी भावना कागदावर लिहाव्यात आणि ते पत्र प्रियकर किंवा प्रेयसीपर्यंत पोहोचवावं, हे आजच्या काळातही प्रभावी ठरू शकेल.

कधी कधी काही लोकांच्या प्रेमाची सुरुवात ही शारीरिक आकर्षणापासून होते. म्हणजे त्या व्यक्तीविषयी मनात काहीच भावना नसतात, पण वय असं असतं जिथं शारीरिक गरज भासते. अशावेळी खोटं खोटं प्रेम व्यक्त करून, शारीरिक वापर करून त्या व्यक्तीला सोडून देणं म्हणजे भूतकाळाच्या पानावर एक ठपका लावून घेण्यासारखं होतं. म्हणून स्वतःला थोडा वेळ द्यावं. खरं तर आपल्या आयुष्यात येणा-या जाणा-या प्रत्येक व्यक्तीविषयी आपल्याला प्रेम, ओढ, माया, आकर्षण वाटत नाही ना. ज्या व्यक्तीविषयी यातील एक जरी गोष्ट वाटते ती आपल्याला कुठेतरी आवडत असते. त्यामुळे शरीरापेक्षा त्या व्यक्तीच्या स्वभावातील काही पटतं का हे बघावं, त्या व्यक्तीला लाईफ पार्टनर बनवू शकता का ते बघावं आणि मगच थेट प्रेम व्यक्त करून आयुष्यभरासाठी त्याला शारीरिक व मानसिकदृष्ट्या आपल्या आयुष्यात घेऊन यावं.

-----------

शब्दस्पर्शी-सुनील शिरपुरे
कमळवेल्ली,यवतमाळ
भ्रमणध्वनी-७०५७१८५४७९

# हिट-अँड-रनरच्या आवळल्या मुस्क्या?

(हिट एण्ड रन कायदा दिन सप्ताह विशेष.)

वाहनानं एखाद्या व्यक्तीला किंवा गाडीला धडक दिली. तसेच, अपघातात जखमी झालेल्यांना मदत करण्याऐवजी चालक वाहन घेऊन फरार झाला, तर या प्रकरणाला हिट अँड रन म्हटलं जातं. हिट अँड रनच्या जुन्या कायद्यानुसार, अशा प्रकरणांमध्ये चालकाला जामीन मिळायचा आणि जास्तीत जास्त दोन वर्षांच्या शिक्षेची तरतूद होती.

नव्या हिट अँड रन कायद्याविरोधातील ट्रक चालकांच्या आंदोलनाचे आता देशाच्या सर्व राज्यांमध्ये तीव्र पडसाद उमटत आहेत. मध्य प्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्र, राजस्थान, बिहार, उत्तर प्रदेश, उत्तराखंड, पंजाब अन् गुजरातमध्ये या आंदोलनाचा प्रभाव जाणवत आहे. राज्यामध्येही विविध शहरांत झालेल्या या आंदोलनाचा मोठा फटका सार्वजनिक वाहतुकीला बसला. मुंबई, ठाणे, नागपूर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, परभणी, नाशिक, कोल्हापूर आणि सांगलीमध्ये चालकांनी आंदोलन केले. पेट्रोल, डिझेल, मिळणे दुरापास्त झाले, त्यामुळे वाहतूक प्रभावित झाली. सर्व प्रकारच्या वाहनांची चाके थबकली. कायदा काय आहे? त्यामध्ये काय बदल झाला आहे? कायद्यात बदल केल्यानंतर चालक का आक्रमक झाले आहेत? त्याचबरोबर याचा काय परिणाम आहे? याबाबत आपण जाणून घेऊयात....

केंद्र सरकारने आणलेल्या हिट अँड रन- ठोक आणि पळून जा कायद्याच्या निषेधार्थ देशभरातील ट्रक आणि डंपर चालक संपावर गेले आहेत. हा कायदा चुकीचा असून तो मागे घ्यावा, अशी त्यांची मागणी आहे. या मागणीसाठी मुंबई, इंदूर, दिल्ली, हरियाणा, यूपीसह अनेक ठिकाणी ट्रकचालकांनी आपले ट्रक रस्त्यांवर उभे करून रस्ते अडवले आहेत. हिट अँड रन म्हणजे काय? तर, ज्या प्रकरणांमध्ये वाहनाच्या धडकेनंतर चालक घटनास्थळावरून पळून जातो ती प्रकरणे हिट अँड रन म्हणून गणली जातात. हिट अँड रन प्रकरणांमध्ये अनेक वेळा जखमी व्यक्तीला वेळीच रुग्णालयात नेल्यास किंवा प्राथमिक उपचार मिळाल्यास तो वाचू शकतो. जुन्या कायद्यानुसार हिट अँड रन प्रकरणात दोन वर्षांच्या तुरुंगवासाची तरतूद होती आणि जामीनही मिळत होता. त्यामुळे गुन्हेगाराला हवी तेवढी भिती वाटत नव्हती किंवा वचक बसता नव्हता, अशी समजूत झाली असावी, असे वाटते.

परंतु, सद्या बघावयास मिळत आहे, की बस-ट्रक चालकांचा संप, वाहतूक व्यवस्था ठप्प, पेट्रोल पंपावर लांबच लांब रांगा; काय आहे कारण? काय आहे हिट अँड रन नवीन कायदा? केंद्र सरकारच्या माध्यमातून मोटार वाहन कायदा पारित करण्यात आला आहे. नवीन कायद्यानुसार वाहनचालक अपघात करून फरार झाल्यास तसेच प्राणघातक अपघाताची माहिती पोलिसांना न दिल्यास चालकांना १० वर्षांपर्यंत तुरुंगवास होण्याची शक्यता आहे. यापूर्वी, आयपीसी कलम ३०४अ अंतर्गत आरोपीला फक्त दोन वर्षांपर्यंत तुरुंगवास भोगावा लागत होता. त्यावर आता सोबतच सात लाख रुपये दंड देखील आकारण्यात येणार आहे. यालाच हिट-अँड-रन कायदा असे म्हटले आहे. यापूर्वी या प्रकरणात आरोपी चालकाला काही दिवसांत जामीन मिळायचा आणि तो पोलिस ठाण्यातूनच बाहेर पडत असे. मात्र, या कायद्यांतर्गत दोन वर्षांच्या तुरुंगवासाचीच तरतूद होती. त्यामुळे

हिट ॲण्ड रन कायद्याविरोधात वाहतूक संघटना आक्रमक झाल्या आणि काळीपिवळी संघटनेचा तीन दिवस बंद होता. कलम १०४मध्ये हिट अँड रन कायद्याचा उल्लेख आहे. नव्याने तयार करण्यात आलेल्या भारतीय न्याय संहितेच्या कलम १०४मध्ये हिट अँड रन कायद्याचा समावेश करण्यात आला आहे. यानुसार, चुकीच्या पध्दतीने वाहन चालवल्यामुळे किंवा निष्काळजीपणामुळे एखाद्याचा मृत्यू झाल्यास, चालकाला जास्तीत जास्त ७ वर्षांची शिक्षा आणि दंडही ठोठावला जाईल. कलम १०४अ मध्ये याचा उल्लेख करण्यात आला आहे. त्याचवेळी, कलम १०४ब मध्ये असे स्पष्टपणे लिहिले आहे की, जर अपघात झाला आणि वाहनाला धडक दिल्यानंतर, चालक स्वतः किंवा वाहनासह घटनास्थळावरून पळून गेला, तर त्याला १० वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा होईल.

फौजदारी कायद्यात केलेल्या बदलांमुळे हिट अँड रन प्रकरणातील शिक्षेमध्येही वाढ करण्यात आली आहे, त्यामुळे देशभरात ट्रक आणि बस चालकांनी विरोध दर्शविला आहे. किंबहुना, हिट अँड रन प्रकरणांमध्ये नवीन कायद्यानुसार, फरार आणि जीवघेण्या अपघाताची तक्रार न केल्यास चालकांना आता दोन वर्षांऐवजी १० वर्षांपर्यंत तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते. बस आणि ट्रक चालकांसोबत ऑटोचालकांनीही शिक्षेचा कालावधी वाढविण्याविरोधात मोर्चा उघडला आहे. शिक्षेचा कालावधी वाढविण्यास विरोध करणाऱ्या ट्रक आणि बस चालकांनी सांगितले की, धुक्यामुळे अपघात झाल्यास चालकांना १० वर्षांपर्यंत कोणतीही चूक न करता शिक्षा होईल. अपघात झाल्यानंतर तेथे राहिल्यास स्थानिकांकडून धोका निर्माण होतो, त्यामुळे कोणत्याही अधिकाऱ्याला माहिती देण्याऐवजी तेथून पळून जाण्याचा प्रयत्न करतात, असे वाहनचालकांचे म्हणणे आहे. ऑल इंडिया मोटार अँड गुड्स ट्रान्सपोर्ट असोसिएशनचे अध्यक्ष राजेंद्र कपूर यांनी हा नवीन कायदा तुघलकी फर्मान असल्याचे म्हटले असून हा कायदा करण्यापूर्वी परिवहन संघटनेच्या सूचनेची दखल घेण्यात आली नाही, असाही आरोप केला आहे. ते म्हणाले की, कोणत्याही अपघातात नेहमी मोठ्या वाहनाच्या चालकाची चूक मानली जाते, रस्त्यावरील अपघातानंतर ट्रक, बस चालकांना मारहाणही केली जाते, आता अशा परिस्थितीत चालकाचा जीव नक्कीच वाचेल. आता सर्व चालक आपली नोकरी सोडत आहेत, कारण ते म्हणतात, की आपण मजूर म्हणून काम केले तर बरे होईल. १० वर्षांची शिक्षा आणि ७ लाख रुपये भरावे लागतील, आता एवढी रक्कम चालकाकडे कुठून येणार? ते पुढे म्हणाले, की ऑल इंडिया मोटर अँड गुड्स ट्रान्सपोर्ट असोसिएशनचे सर्व प्रमुख अधिकारी यांनी आभासी बैठक घेतली आहे. सरकारने हेल्पलाइन क्रमांक जारी केल्यास ज्यामध्ये रस्ता अपघातानंतर चालक किंवा त्याच्या मालकाने अपघाताची माहिती दिली तर त्याला हा कायदा लागू होत नाही. अपघातस्थळी जखमीला सोडून पळून जाणे, ही कृती अमानवीय आहे. प्रत्येक वाहनचालक जखमींना तडफडत सोडून जात नाही, परंतु जनतेच्या हिंसक हल्ल्यापासून स्वतःचा जीव वाचविण्यासाठी तो जमावापासून दूर पळतो. तो दूर पळाला म्हणून त्याला कडक शिक्षा करणे, दंड ठोठावणे, हेही तितकेच अमानवीय नाही का? असा प्रतिसवाल करत वाहनचालक संघटना एकवटून नवीन लागू करण्यात आलेला कायदा सरकारने रद्द करावा, म्हणून कंबर कसू लागल्या आहेत, हे येथे उल्लेखनीयच!

नवीन कायदा तसा अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी आणि अपघात पिडीत व्यक्तींवर तात्काळ उपचार होण्याच्या दृष्टीने अगदी योग्य आहे, असाही सूर जनतेतून उमटत आहे. असे असले तरी नुसत्या अपघात होण्याच्या भितीमुळे उद्योगधंदे, वाहतूक व्यवस्था सारे काही ठप्प पडले. जनजीवन विस्कळीत झाले. केवळ वाहनचालकांच्या वाहन न चालविण्याच्या निर्णयामुळेच. तेव्हा व्यवसाय व व्यावसायिकांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता कायदा थोडा शिथिलच असावा, हे बोलण्यास जागा निर्माण झाली आहे, असे निदर्शनास येते.

-----

– संकलन व सुलेखन –
श्री कृष्णकुमार लक्ष्मी-गोविंदा निकोडे गुरूजी. रामनगर वॉर्ड, गडचिरोली. फक्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉयर्स लीग, लातूर व फॅमिली लॉयर्स बार असोसिएशन, लातूरच्या संयुक्त विद्यमाने ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले जयंती उत्साहात साजरी.




लातूर– डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉयर्स लीग, लातूर व फॅमिली लॉयर्स बार असोसिएशन, लातूरच्या वतीने आयोजित कौटुंबिक न्यायालय, लातूर येथील कार्यक्रमात सावित्रीमाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कौटुंबिक न्यायालय, लातूर येथील मा. न्यायाधीश सतीश पाटील यांच्या हस्ते सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कौटुंबिक न्यायालय, लातूर येथील मा. न्यायाधीश सतीश पाटील यांच्यासह कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ॲड. भालचंद्र कवठेकर यांची उपस्थिती होती तर प्रमुख पाहुणे म्हणून कौटुंबिक न्यायालयाचे प्रबंधक श्री. एम. के. कलशेट्टी व समुपदेशक श्री. लक्ष्मीकांत कामळजकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉयर्स लीगचे प्रतिनिधी ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. शिवकुमार बनसोडे आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व मनोगत ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. शिवकुमार बनसोडे यांनी केले व प्रास्ताविकेमध्ये त्यांनी सावित्रीमाई फुले यांचे विचार आजच्या काळात प्रेरणादायी आहेत तसेच आजच्या दिनी फातिमा शेख यांचे स्मरण सुद्धा सर्वांनी करणे आवश्यक आहे कारण त्याकाळात सावित्रीबाई फुले यांच्या सोबत त्यादेखील समाजसुधारक होत्या. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या त्या सहकारी होत्या.डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉयर्स लीग हे विचार मंच गेली ६ वर्ष झाले सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातूनशिव, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांची जागृती करीत आहे आणि समाजाचे आपण देणे लागतो या प्रामाणिक भावनेतून महापुरुषांचे विचार लोकांपर्यंत घेऊन जाण्याचे दायित्व आम्ही स्वीकारले आहे असे मत व्यक्त केले आहे. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ॲड. भालचंद्र कवठेकर यांनी सावित्रीमाई फुले यांच्या जयंतीनिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या व महापुरुषांच्या विचारात खूप मोठी ताकद आहे व परिवर्तनवादी विचार माणसात आमूलाग्र बदल घडवून आणतो त्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करणे गरजेचे असते व प्रत्येकांनी आपल्या घरातील महिलांना सन्मान द्यावा व कौटुंबिक वाद अधिक प्रमाणात वाढणार नाहीत याची काळजी घेतली पाहिजे आणि अपवादाने जरी कौटुंबिक वाद झाले तरी ते आपापसात कसे मिटतील यासाठी प्रयत्न करावेत असा संदेश दिला व वाढणारे कौटुंबिक हिंसाचाराचे वाद लक्षणीय वाढत असल्यामुळे त्यांनी चिंता व्यक्त केली. त्यानंतर कौटुंबिक न्यायालय, लातूर येथील मा. न्यायाधीश सतीश पाटील साहेब यांनी प्रत्येक यशस्वी पुरुषांच्या मागे यशस्वी महिलेचा हात असतो तसेच काहीशी बाब म्हणजे यशस्वी महिलेच्या मागे सुद्धा यशस्वी पुरुषांचा देखील हात असतो आणि क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांनी सावित्रीमाई फुले यांना त्या काळात सहकार्य केले नसते तर आज सावित्रीबाई फुले ह्या घडल्या नसत्या हे सुद्धा लक्षात घेतले पाहिजे आणि महात्मा फुले यांच्या सहकार्यानेच सावित्रीबाई फुले यांनी सामाजिक क्रांती केली आहे असे मत त्यांनी व्यक्त केले. याप्रसंगी न्यायालयातील महिला कर्मचारी वर्ग, पोलीस कर्मचारी यांचा कौटुंबिक न्यायालय, लातूरचे मा. न्यायाधीश सतीश पाटील साहेब यांच्या हस्ते ग्रंथ भेट देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. सचिन कांबळे यांनी केले तर आभार प्रदर्शन ॲड. श्रीपती चव्हाण यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कौटुंबिक न्यायालयाचे कर्मचारी, डॉ बाबासाहेब आंबेडकर लॉयर्स लीग, लातूरचे विधिज्ञ यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास ॲड. श्रीपती चव्हाण ॲड. प्रदीप गायकवाड, ॲड. प्रशांत गायकवाड, ॲड. दिपक साठे, ॲड. खलील शेख, ॲड. चंद्रकांत सूर्यवंशी तसेच लातूर कौटुंबिक न्यायालयातील कर्मचारी श्री दीपक सोनाळे, श्री लहू पन्हाळे, श्री शंकर तानवडे, श्री अक्षय कांबळे, श्रीमती ढगे व इतर न्यायालयीन कर्मचारी, पोलीस, पक्षकार आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



धाराशिव जिल्ह्याचे भीमशक्ती सामाजिक संघटनेचे धाराशिव जिल्हाध्यक्ष मेसा जानराव यांच्या गाडीचा किरकोळ अपघात झाला होता.सदर घटनेची माहिती मिळताच भीमशक्ती सामाजिक संघटनेचे मराठवाडा संघटक चंद्रकांत खरात सर यांनी धाराशिवला त्यांच्या राहत्या घरी जाऊन भेट घेऊन त्यांच्या तब्येतीची चौकशी करत विचारपूस केली. याप्रसंगी अशोक बनसोडे साहेब, महाराष्ट्र सरचिटणीस, सुनील धिम धिमे, बीड जिल्हा प्रसिद्धीप्रमुख, विकास हावळे, तुळजापूर तालुका अध्यक्ष, अलाउद्दीन शेख, केज तालुका कार्याध्यक्ष याप्रसंगी उपस्थित होते.

# संतोष देशमुख खुनातील फरारी मुख्य आरोपी सुदर्शन घुले ,सुधीर सांगळे यांना पाण्यातुन तर सिद्धार्थ सोनवणे यास मुंबई येथून अटक

**तिन्ही आरोपीला माननीय न्यायालयासमोर हजर केले असता १४ दिवसांची पोलीस कोठडी ठोठावली**

केज/प्रतिनिधी संतोष देशमुख खुनातील फरारी मुख्य आरोपी सुदर्शन घुले ,सुधीर सांगळे यांना पाण्यातुन तर सिद्धार्थ सोनवणे यास मुंबई येथून अटक करण्यात आले आहे.तिन्ही आरोपीला माननीय न्यायालयासमोर हजर केले असता १४ दिवसांची पोलीस कोठडी ठोठावली आहे. २५ दिवसानंतर केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करुन पुन्हा निर्दयीपणे क्रुर पध्दतीने हत्या प्रकरणातील दोन मुख्य आरोपी सुदर्शन घुलेसह, सुधीर सांगळेला पुण्यात शुक्रवारी मध्यरात्री अटक तर सिद्धार्थ सोनवणे याला मुंबई उपनगरातून अटक करुन केज येथील मा. न्यायालयात शनिवारी दुपारी हजर करण्यात आले.

**आरोपीला १४ दिवसांची पोलीस कोठडी**

**राज्यभर गाजत असलेल्या मस्साजोग येथील युवा सरपंच संतोष देशमुख यांचे आपहरण आणि हत्या प्रकरणातील आरोपी सुदर्शन घुले आणि त्याचा साथीदार सुधीर सांगळे या दोन्ही आरोपींना न्यायालयाने १४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. पोलिसांनी केज मा. कोर्टात हजर केले होते. दरम्यान, आरोपीने या प्रकरणी अनेक धक्कादायक खुलासे होण्यासाठी , त्यामुळे आरोपीला न्यायालयीन कोठडी मिळावी असा युक्तिवाद सरकारी वकिल बाळासाहेब कोल्हे यांनी केला . आज न्यायालयाने १४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली. यावेळी आरोपीच्या वतीने अनंत बाबुराव तिडके यांनी काम पाहिले, परिसरात तगडा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.सिद्धार्थ सोनवणे यानी घटनेच्या दिवशी आरोपींना सरपंच संतोष देशमुख यांचे लोकेशन सह माहिती देण्याचे काम केले आहे. सदर घटनेमध्ये आरोपींना सोनवणे याने सहकारी केले आहे म्हणून सिद्धार्थ सोनवणे यास पोलिसांनी अटक करून माननीय न्यायालयासमोर हजर करण्यात आले आहे.**




केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे ९ डिसेंबर रोजी केज जवळील टोलनाक्यावरुन अपहरण करुन पुन्हा हत्या केल्याच्या घटनेला २५ दिवसाचा कालावधी झाला असून आतापर्यंत महेश केदार, जयराम चाटे, प्रतीक घुले, विष्णू चाटे, वाल्मिक कराड (खंडणी प्रकरणात) आतापर्यत अटक करण्यात आले आहेत. या घटनेतील मुख्य आरोपी सुदर्शन घुले व सुधीर सांगळे, कृष्णा आंधळे हे फरार असल्याने त्यांना अटक करण्याच्या मागणीसाठी बीड येथे गेल्या शनिवारी सर्वपक्षीय मोर्चा काढून शासनाकडे अटक करण्याची मागणी केल्यानंतर पोलीस प्रशासन खडबडून जागे होऊन सीआयडी.एस.आयटीचे पथके नेमून या तीन फरार आरोपींचा शोध घेत होते. पण आरोपी काही सापडत नव्हते व केज तालुक्यातील कासारी गावचे डॉ. सभाजी वायबसे हे मस्साजोगची घटना घडल्यापासून फरार होते त्यांचा पोलीस तपास घेते होते पण ते देखील पोलीसांना गुंगारा देऊन पसार होते. शुक्रवारी पोलीसांनी डॉ. सभाजी वायबसे याला ताब्यात घेल्यावरच शुक्रवारी संध्याकाळी संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी सुदर्शन घुले व सुधीर सांगळे यांना पुण्यात अटक करुन शनिवारी पहाटे केजच्या दिशेने एका स्कॉर्पिओ गाडीने आरोपी पोलीस बंदोबस्तात केज येथे दुपारी १–१५ वाजता केजच्या उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय तपासणी करुन पुन्हा केज पोलीस ठाण्यात अटकेची प्रक्रीया करून केजच्या न्यायालयात दुपारी ३–०० वाजता हजर केले आहे. मुख्य आरोपी सुदर्शन घुले अटक केल्याने या हत्येचा कट कोणी व कशासाठी रचला याचे रहस्य उघड होणार आहे याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# स्त्री शिक्षणाच्या जनक : सावित्रीमाई फुले यांच्या जयंती दिनी

नवी मुंबई / के. एच. हनवते :– नवी मुंबई समाजवादी पार्टीच्या वतीने स्त्रीशिक्षणाच्या जनक अद्यसमाजसुधारक क्रांतीज्योती : सावित्रीमाई फुले यांची जयंती ३जाणेवारी २०२५ रोजी नवी मुंबईतील कोपरखैरणे, घनसोली, वाशी, उलवे येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली त्यावेवेळी समावादी पक्षांच्या मान्यवरांनी आपले मनोगत वेक्त करताना म्हणाले की, महायुगपुरुष आणि थोर राष्ट्रीय स्त्रियांचे कार्य हे तळागळातील लोकांपर्यंत पोहोचले तरच, तेव्हांकुठे समाजामध्ये प्रबोधन होईल..! आणि म्हणून अशे कार्यक्रम करण्याची खूप गरज आहे, समाजवादी पार्टी महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष : लोकप्रिय आमदार अबू आझमी यांच्या विधान सभेतील वक्तव्याला सार्थ रूप देण्याच्या दिशेने आयु. मिथुन कांबळे यांचा हा नवी मुंबई येथील उपक्रम २०२५च्या नूतन वर्षी क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जयंती निम्मित राबवण्यात आला. असेच कार्यक्रम करून समाज प्रबोधन वर्षभर राबवण्यात येतील,महिला सक्षमीकरण कार्यक्रम क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जयंती निमित्त नवी मुंबई येथे विविध ठिकाणी विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आले, प्रथमच महिलांसाठी महिलांनी केलेला असा हा कार्यक्रम समाजवादी पार्टीचे नवी मुंबई जिल्हा उपाध्यक्ष आणि एक दशकांहून अधिक काळ सामाजिक कार्य करणारे मिथुन कांबळे यांच्या आथक मार्गदर्शनाखाली हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. सुमारे ५०० लोकांनी सहभाग घेतला, त्यापैकी प्रामुख्याने स्त्रिया आणि मुली आधीक संख्येत उपस्थित होत्या. नवी मुंबईच्या विविध भागांतील महिला आपले गटतट बाजुला ठेवुन महीला एकत्र आल्या. शालेय मुली तसेच युवती हि सोबत आल्या. कार्यक्रमात प्रत्येक सहभागी महिलेला सावित्रीमाई फुले यांच्या प्रेरणादायी विचारांचा समावेश असलेला पोस्टर, तसेच त्यांच्या जीवनावर आधारित पुस्तक देण्यात आले. कार्यक्रमात सावित्रीमाई फुले यांचे जीवनकार्य आणि त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान, या बद्दल चर्चा करण्यात आली. मिथुन कांबळे यांचे पुढील सामाजिक दृष्टिकोन आणि महिला सक्षमीकरणासाठी त्यांचे प्रयत्न याबद्दल माहिती देण्यात आली. तसेच महिलांना त्यांच्या समस्या किंवा काही माहिती पाहिजे असल्यास समाजवादी पार्टीला संपर्क कसे करावे याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. शेवटच्या क्षणी सर्वांना चहा–नाष्ट्याचा आस्वाद घेत कार्यक्रम यशस्वी रित्या संपन्न झाला,प्रतिसादया कार्यक्रमामुळे सावित्रीमाई फुले यांची स्मृती जागवण्यास मदत झाली आणि त्यांच्या कार्यामुळेच आपण येथे आहोत, याची जाणीव झाली, पहिल्यांदाच स्वतः आयोजन करून कार्यक्रम घेतल्याने, महिलांमध्ये उत्साह व आत्मविश्वास निर्माण झाला या कार्यक्रमामुळे महिलांना प्रेरणा मिळाली आणि त्यांच्या सक्षमीकरणाच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकण्यास मदत झाली, या कार्यक्रमास संजय नाना जगताप – मुंबई प्रदेश उपाध्यक्ष यांनी वेळ काढून कार्यक्रमाला भेट दिली आणि लोकांचे मनोबल वाढवले. त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. तसेच पक्षातील माझ्या सहकार्यांचे आभार सर्वात महत्वाचे सर्व महिला, युवा, युवती, पुरुष मंडळी ज्यांनी इतक्या उत्साहात कार्यक्रमात भाग घेतला, त्यांना माझा क्रांतिकारी सप्रेम जय भीम सदर कार्यक्रमाचे आयोजन नियोजन: समाजवादी पार्टी मिथुन भानुदास कांबळे (उपाध्यक्ष) नवी मुंबई च्या वतीने करण्यात आले होते.

# चंपावती नेत्रालय,ऑप्टिकलच्या संयुक्त विद्यमाने नवीन वर्षात १ जानेवारी ते २६ जानेवारी पर्यंत मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन

केज/प्रतिनिधी चंपावती नेत्रालय,ऑप्टिकलच्या संयुक्त विद्यमाने नवीन वर्षात १ जानेवारी ते २६ जानेवारी पर्यंत मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे किशोर साहेब तालुक्यातील आणि परिसरातील नेत्र रुग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. डोळ्यांच्या आजारासाठी रुग्णांना आता बीड,लातूर, पुणे, मुंबईला जान्याची गरज नाही असे माध्यमाशी बोलताना डॉ.रवींद्र गालफडे यांनी सांगितले. केज शहरात प्रथमच चंपावती नेत्रालय व ऑप्टिकलच्या माध्यमातून रुग्णांची सेवा करण्यासाठी केज शहरासह तालुक्यात स्तुत्य उपक्रम चालू केला आहे या नवीन वर्षामध्ये १ जानेवारी ते २६ जानेवारी पर्यंत रुग्णांच्या डोळ्याची तपासणी मोफत केली जाणार आहे. आमच्या प्रतिनिधीशी बोलताना चंपावती नेत्रालयाचे डॉ. गालफाडे यांनी




सांगितले की, आता बीड, लातूर,पुणे, मुंबई असे कोठेही जाण्याची गरज नाही आपल्या हॉस्पिटलमध्ये सर्व प्रकारचे, मोतीबिंदू , तिरळेपणा, डोळ्यातील पडदा काचोळा, सर्व प्रकारच्या लेन्स टाकणे अशा विविध प्रकारचे ऑपरेशन केले जाणार आहेत. तेही सवलतीच्या दरामध्ये करण्यात येणार आहे. तसेच सर्व रुग्णांना सुचित करण्यात येते की, सध्या नवीन वर्षाच्या व प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधत चंपावती नेत्रालयाच्या माध्यमातून उलटा त्याची मोतीबिंदू शस्त्रक्रिया, काचबिंदू निदान व शस्त्रक्रिया, लहान बाळांची रेटीना तपासणी व लेझर उपचार, तिरळेपणा निदान व उपचार आणि शस्त्रक्रिया, बिन टाका काचोळा (प्टेरिजिअम) ची शस्त्रक्रिया, नासूर (डोळ्यातून चिकट पाणी येणे) शेअर शस्त्रक्रिया, पापण्यावरील गाठी व आजारावरील ते शस्त्रक्रिया, कॅम्पुटर द्वारे नेत्र तपासणी, सर्व प्रकारचे नंबरचे चष्मे व सनग्लासेस उपलब्ध, सर्व प्रकारच्या शस्त्रक्रियेसाठी केज मध्ये सुसज्ज ऑपरेशन थिएटर या सह इतर डोळ्यांच्या तपासण्या मोफत केल्या जाणार आहेत.

या चंपावती नेत्रालयांमध्ये तज्ञ डॉक्टर्स डॉ.नारायण आळणे, डॉ.संदीप सानप, डॉ.रवींद्र गालफाडे हे रुग्णांना २४ तास सेवा देण्यासाठी उपलब्ध आहेत. संपावती नेत्रालय व ऑप्टिकल च्या स्तुत्य उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.

# शिक्षण हे अंधाराच्या वाटेवरून प्रकाशाकडे नेणारा मार्ग होय - लक्ष्मण भगत

मुंबई / प्रतिनिधी :– १९ व्या शतकात कर्मठ मनुवादी समाजव्यवस्था असल्यामुळे समाजातील सर्वच स्तर अंधश्रद्धा, कुप्रथा, चालीरूढी आणि गुलामीच्या जोखडाखाली अडकलेले होते अश्या वेळी कर्मठ मनुवादी व्यवस्थेला सुरुंग लावून तळागाळातील समाजाला मनुवादी जोखडातून मुक्त करण्यासाठी थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले व माता सावित्रीबाई फुले यांनी निकराचा लढा दिला, ज्योतिबा फुलेंनी त्यांची पत्नी सावित्रीबाईंना शिक्षण देऊन त्यांना शिक्षिका बनवले व पुण्यात भिडे वाडा इथे पहिली मुलींची शाळा सुरू केली त्यावेळी कर्मठ मनुवादी समाजाने सावित्रीबाईंना भयंकर त्रास दिला शेणाचे गोळे, दगडधोंडे फेकून मारले परंतु ते सहन करून सावित्रीबाईंनी ज्ञानाची ज्योत लावली त्यामुळेच आज सर्वच समाजातील मुली,



महिला शिक्षण घेऊन उच्चपदावर जाऊन पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करीत आहे म्हणूनच शिक्षण हे अंधाराच्या वाटेवरून प्रकाशाकडे नेणार मार्ग आहे असे प्रतिपादन अध्यक्ष या नात्याने बोलत असताना लक्ष्मण भगत यांनी केले. बौद्धजन पंचायत समिती मध्यवर्ती महिला मंडळ यांच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा १९४ वा जयंती महोत्सव बौद्धजन पंचायत समितीचे कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह, भोईवाडा, परेल, मुंबई – १२ येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला, सदर कार्यक्रमाच्या प्रारंभी माता सावित्रीबाई यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून ज्योत प्रज्वलित करण्यात आली, संस्कार समितीचे अध्यक्ष मंगेश पवार आणि मनोहर मोरे यांनी आपल्या सुमधुर वाणीने धार्मिक पूजाविधी संपन्न केला, मध्यवर्ती महिला मंडळाच्या सरचिटणीस अंजलीताई मोहिते यांनी अत्यंत लाघवी व समर्पक भाषाशैलीत सूत्रसंचालन करून उपस्थितांची मने जिंकून घेतली तर समितीचे सरचिटणीस राजेश घाडगे यांनी प्रस्तावित सादर करताना सदर कार्यक्रम हा महिलांचा असून महिलांनीच या कार्यक्रमाला सुरवात केली पाहिजे असे नमूद करीत त्यांनी माता सावित्रीबाई फुले यांच्या जीवनपटावर प्रकाशझोत टाकत महिलांना मार्गदर्शन केले. तद्नंतर उपकार्याध्यक्ष एच.आर. पवार बोलत असताना महिलांनी सावित्रीबाई फुलेंचा आदर्श मनात घेऊन आचार, विचारात सावित्रीबाईंना सामावून त्यांचा वारसा अंगीकारला पाहिजे त्याचसोबत आपल्या बहुजन समाजातील महामातांना समजून त्यांचा अंगीकार केला पाहिजे तरच भावी पिढ्या घडवता येतील असे नमूद करून सर्वांना जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या. त्याचप्रमाणे मध्यवर्ती महिला मंडळ अध्यक्षा सुशीलताई जाधव, उपाध्यक्षा प्रमिलाताई मर्चंडे, दर्शन जाधव, प्राजक्ता प्रमोद तांबे, ज्योती तांबे, प्रज्ञाताई जाधव, योगिता उल्हास मोरे, सोनाली गायकवाड, वंदनाताई पवार, गौतमीताई पवार, आशाताई जाधव, धनश्री जाधव, सुशीला जाधव आदी मान्यवरांनी आपले मौलिक असे विचार मांडून माता सावित्रीबाई फुलेंच्या स्मृतींस अभिवादन केले. सदर कार्यक्रमास शिवडी, सायन, भायखळा विभागातील महिला बहुसंख्येने उपस्थित होत्या तसेच व्यवस्थापक मंडळाचे यशवंत कदम, शिवडी विभाग क्र. १३ चे गटप्रमुख राजाभाऊ तथा रामदास धो. गमरे, श्रीधर जाधव, निवडणूक मंडळाचे अध्यक्ष मिलिंद जाधव, विश्वस्त मंडळाचे सदस्य आदी मान्यवर ही उपस्थित होते, सरतेशेवटी मध्यवर्ती महिला मंडळाच्या सरचिटणीस अंजलीताई मोहिते यांनी सदर कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडण्यासाठी अथक परिश्रम घेणाऱ्या सर्व महिलांचे, विश्वस्त मंडळाच्या सदस्यांचे व सर्व उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# सावित्रीच्या लेकिनो सावधान मनुस्मृती येत आहे- आनंद म्हस्के



चेंबूर :- राष्ट्रमाता ज्ञानज्योती सावित्रीमाई,राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले, फातिमा शेख यांनी मनुस्मृतीला नाकारून महिलांसाठी शिक्षणाची दारे खुली केली.तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मनुस्मृतीचे दहन करून स्त्री पुरुष समानतेचा कायद्याने अधिकार दिला.परंतु ज्यांच्या त्यागमुळे सर्व जग पादक्रांत करायला निघालेल्या निघालेल्या सावित्रीच्या लेकीना सावित्रीच्या विसर पडत चालला आहे.पुरोगामी सोडल्या तर इतर महिला ८ मार्च महिला दिन प्रमाणे क्रांती ज्योती सावित्रीमाई फुले फतेमा शेख यांची जयंती साजरी करताना दिसत नाहीत. परंतु लक्षात ठेवा तुम्ही विद्येची देवता सावित्रीमाई विसरून सत्यवान सावित्रीची वट पौर्णिमा साजऱ्या करीत असाल तर परत तुम्हाला गुलाम करून पुरुषाच्या पायाची दासी बनविणारी मनुस्मृती येत आहे.आणि त्या गुलाम करणाऱ्या मनुस्मृतीचे स्वागत चक्क दिल्लीच्या न्यायमूर्ती प्रतिमा सिंह या उच्च शिक्षित महिलेने केलेले आहे. म्हणून सावित्रीच्या लेकीनो जागे होवून मनोहर भिडे सारख्या मनुवादी किड्याची डोकी वर निघण्या आधीच ठेचून काढा. असे आंबेडकरी साहित्यिक आनंद म्हस्के आपल्या भाषणात म्हणाले. प्रियदर्शी महिला मंडळ आणि रमाबाई कॉलोनी महिला मंडळ यांच्या वतीने प्रियदर्शी बुद्ध विहार चेंबूर पी. एल. लोखंडे मार्ग येथे शासनाचा क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले पुरस्कार विजेत्या हिराबाई निकम यांच्या अध्यक्षतेखाली क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांची १९४ वी जयंती साजरी करण्यात आली.त्यावेळी प्रमुख वक्ते आंबेडकरी विचारवंत आनंद म्हस्के बोलत होते.यावेळी आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्त्या अभय कांबळे मावशी आपल्या भाषणात म्हणाल्या आज दलित महिला देशाची राष्ट्रपती ही सावित्रीमाई यांची देणं आहे. रेखाताई कांबळे म्हणाल्या सावित्रीमाईची जयंती असली तरी त्यांच्यामुळे राजमाता जिजाऊ माता रमाई फातिमा शेख, अहिल्याबाई होळकर यांच्या कार्याला उजाळा दिला जातो.महिलांनी सत्यवानची सावित्री नव्हे तर ज्योतीचा सावित्री समजून घेतली तर त्यांचा उध्दार होणार आहे.

यावेळी आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्या अलका सदरे , कापडेबाई याची भाषण झाली .अध्यक्षीय भाषणात हिराबाई निकम म्हणाल्या यांनी उपस्थित असलेल्या सर्व महिलांचे आभार व्यक्त करून म्हंटले की आपण माता रमाईची जयंती मोठ्या प्रमाणात साजरी करतो .तशीच सावित्रीमाई फुले याचे देखील पुढच्या वर्षी मोठ्या प्रमाणात जयंती साजरी करणार .त्यांच्या त्यागातून महिला जागृत करणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे. कार्यक्रमाचे सूत्र संचालन बौद्धचारी विजय पगारे यांनी केले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आकाश साळवे यांनी परिश्रम घेतले.

# प्रबोधनकार सुप्रसिद्ध गायक भीम शाहीर प्रदीप कडबे, यांच्या गायनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन व जाहीर सत्कार

तुमसर :- भंडारा कलाकार बहुद्देशीय संस्था भंडारा द्वारा आयोजित, २ दिवसीय भव्य राज्यस्तरीय कलाकार मेळावा, व नाट्य महोत्सव, दिनांक०३/०४ जानेवारी २०२५, स्थळ पांज रा, ( दे ) तालुका तुमसर जिल्हा भंडारा येथे मोठ्या उत्साहात पार पडला, कार्यक्रमाचे उद्घाटक :- मधुकर कुकडे माजी खासदार भंडारा गोंदिया लोकसभा क्षेत्र यांच्या हस्ते पार पडला, कार्यक्रमाचे अध्यक्ष :- इंजिनीयर प्रदीप पाटोळे नगराध्यक्ष तुमसर, प्रमुख पाहुणे:- भाऊराव तुमसरे, कृषी उत्पन्न बाजार समिती तुमसर, राजूभाऊ कारा मोरे, आमदार तुमसर मोहाडी विधानसभा क्षेत्र, ज्योती वाघये, मानधन समिती सदस्य भंडारा, आशिष कु क डे नगरसेवक तुमसर, प्रमोद तीतरमारे, उपाध्यक्ष नगरपरिषद तुमसर, गणेश देशमुख जिल्हाध्यक्ष, रवींद्र ठवकर, लक्ष्मण हरगुडे, रेखा पटले, बाळकृष्ण बुधे, शाहीर सुखदेव मारबते, कार्तिक मेश्राम, श्रीकांत तुमस रे, प्रबोधनकार सुप्रसिद्ध गायक, भीम शाहीर प्रदीप कडबे, निलेश पोटफोडे, राम प्रभू साठवणे, शाहीर गणेश मेश्राम, सुषमा निमजे, हेमलता हारगुडे, कौतुका साळवे, माधुरी इखार, रामनाथ कळंबे, राम रतन खोकले, निरंजन कानफाडे, इत्यादी मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेची पूजन करून दिपप्रजलित करण्यात आले, याप्रसंगी रामटेक तालुक्यातील




किरणापूर येथील प्रबोधनकार सुप्रसिद्ध गायक, भीम शाहीर प्रदीप कडबे, यांनी गायनाच्या माध्यमातून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्य, यांचे विज्ञानवादी विचार :- मुली शिकविण्यासाठी उभी राहिली खंबीर, चिखल, शेन, माती, फेके, तिच्या अंगावर, नाही घाबरली कोणाला विरोध जरी झाला, स्त्री शिक्षणाची जिद्द होती माझ्या माऊलीला, मी सांगतो ऐका खरं, शिक्षणावर द्यावा भर, चिखल, शेन, माती फेके तिच्या अंगावर, अशाप्रकारे विज्ञानवादी विचार मांडून समाजप्रबोधन गीत सादर केले त्यांच्या जाहीर सत्कार करण्यात आला, याप्रसंगी शाहीर गणेश मेश्राम, सुभाष, द, बावनकुळे, रमेश धुर्वे, कोधामेंढी, शाहीर अरुण मेश्राम, गणेश देशमुख, भीम शाहीर प्रदीप कड बे, ज्योत्स्ना मेश्राम, वर्षा शेंडे, पत्रकार धम्मपाल मेश्राम, पत्रकार हुमणे, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश आखिलकर यांनी केले, आभार प्रदर्शन रेखा पटले यांनी केले, मोठ्या संख्येने गायक कलाकार उपस्थित होते

## प्रतिभा गायकवाड उगाडे यांना पीएचडी पदवी प्रदान

औसा :- बी.एस.एस कला वाणिज्य,व विज्ञान महाविद्यालय, माकणी येथे ग्रंथपाल म्हणून कार्यरत असलेल्या श्रीमती प्रतिभा भीमराव गायकवाड (उगाडे) यांना नुकतेच कवयित्री बहिणाबाई चौधरी नॉर्थ महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव या विद्यापीठाने पीएचडी ही पदवी प्रदान केली आहे. त्यांना ' *युज ऑफ वेब बेसड् इलेक्ट्रॉनिक रिसोर्सेस बाय पोस्ट ग्रॅज्युएट स्टुडन्ट ऑफ नॅक क्रेडिएटेड कॉलेजेस स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड : अ क्रिटिकल अनालिसिस' या विषयावर डॉ.वैजनाथ कांबळे यांनी मार्गदर्शन केले आहे. तर डॉ.शर्मिला चिकाटे आणि डॉ. प्रदीप घंटे यांनी त्यांना या संशोधनकार्यासाठी सहकार्य केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे भीमराव गायकवाड, राजरत्न गायकवाड, रेखा गायकवाड ,धीरज गायकवाड, योजना गायकवाड ,डॉ. लहू वाघमारे, डॉ.मानसी उगाडे,शशांक उगाडे, विवेक उगाडे तसेच समस्त गायकवाड व उगाडे परिवारांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले आहे.



## दर्यापूरात रंगणार फुले शाहू आंबेडकर राज्यतरीय पहिले साहित्य संमेलन साहित्य चळवळीतील साहित्यिकांना मिळणारं पुरस्काराची मेजवानी

यवतमाळ/ प्रतिनिधी :-अमरावती जिल्हातील पिंपळोद येथील कार्यरत कला फाऊंडेशन ही संस्था महाराष्ट्राच्याच कानाकोप-यात नव्हे तर देश विदेशात देखील आपल्या कार्याचा ठसा उमटवित नाव लोकिक प्राप्त केला आहे. कला फाऊंडेशन रजि. नं.एफ २७३१३ द्वारा आजवर अनेक पुरस्कार सोहळे, साहित्य संमेलन आयोजित करून आपल्या अंगी कोणत्या ना कोणत्या कलागुण जोपासणा-या आणि विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणा-या अशा किती तरी होतकरू कलावंतांना त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. दरवर्षी प्रमाणे या वर्षी देखिल म्हणजेच २०२५ मध्ये कला फाऊंडेशनच्या वतीने कला, क्रीडा, साहित्य, पत्रकारिता, पर्यावरण, गायन, नृत्य, शैक्षणिक, चित्रकार, वकृत्व, सामाजिक, पथनाट्य, अभिनय अशा अनेक विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणा-या कलावंताचा गुणगौरव करण्यात येत आहे. तरी आपण समाजात वावरत असताना पाहतो की आपले संत महापुरुषांनी साहित्य किंवा कुठल्या ही क्षेत्रात अगदी नि:स्वार्थपणे समाजाची सेवा करून गेले. त्यांच्याच प्रेरणेने आपणही एक सेवा करावी या उद्देशाने साहित्य चळवळ बळकट करून एक हक्काच व्यासपीठ मिळावे यासाठी फुले, शाहू, आंबेडकर पहिले साहित्य संमेलन आम्ही घेत आहोत. या संमेलनात साहित्य रत्न, कला गौरव, निसर्ग प्रेमी, आदर्श शिक्षक, डॉ.अब्दुल कलाम, नारीशक्ती जीवनगौरव, संत गाडगेबाबा, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे, डॉ.भीमराव आंबेडकर समाज सुधारक पुरस्कार इ. पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येईल. तरी इच्छुकांनी आपल्या कार्याची माहिती, बायोडाटा खालील पत्त्यावर किंवा पीडीएफ स्वरुपात असल्यास व्हॉट्सॲप वर पाठवण्याचे आवाहन संस्थेचे अध्यक्ष प्रशात दामले यांनी केले आहे.

# धर्मराज बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड यांच्या वतीने पांगरबावडी येथील मसणजोगी वस्ती येथे सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी

केज/प्रतिनिधी धर्मराज बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड यांच्या वतीने पांगरबावडी येथील मसणजोगी वस्ती येथे जयंती साजरी करण्यात आली .भारतीय स्त्री मुक्तीच्या व स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या, प्रथम शिक्षिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची ३ जानेवारी जयंतीदिन. स्त्री उद्धारासाठी आपले सर्वस्व वाहून देत महात्मा ज्योतिराव फुले यांनी हाती घेतलेल्या समाजोद्धाराचा वसा तितक्याच नेटाने पुढे नेणाऱ्या सावित्रीबाईंना त्यांच्या १९२ व्या जयंती दिनानिमित्त त्यांना अभिवादन केले व सर्वांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत त्यांना शिक्षण घेण्यासाठी प्रवृत्त करण्याचे कठीण कार्य ज्योतिराव व सावित्रीबाई यांनी केले. १ जानेवारी १८४८ रोजी पुणे येथील बुधवार पेठेत मुलींची पहिली शाळा काढून या दाम्पत्याने प्रथम शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. काही धर्ममार्तंडांनी 'धर्म बुडाला' अशी ओरड केली व सावित्रीबाईंवर धर्मबुडवी म्हणून ते शेणमाती, दगड फेकू लागले. तरीसुद्धा त्या मागे हटल्या नाहीत. अस्पृश्यांना शिकविल्यामुळे सनातनी मंडळी जास्तच



चिडली. त्यांनी ज्योतिरावांच्या वडिलांवर सामाजिक बहिष्कार टाकण्याची धमकी दिली. त्यामुळे ज्योतिरावांच्या वडिलांनी त्यांना घराबाहेर काढले. वयाच्या अवघ्या १९ व्या वर्षी सावित्रीबाई फुले यांना घराबाहेर पडणे भाग पडले. अशाही परिस्थितीत सावित्री मुळीच डगमगली नाही. ज्योतिरावांच्या कार्यात त्यांनी पूर्णपणे साथ देण्याची तयारी केली होती. सावित्रीबाई फुले अशिक्षीत होत्या. त्यांना ज्योतिराव फुले यांनी घरी शिकविले व नंतर शाळेत शिक्षण देण्याचे कार्य सावित्रीबाईंनी केले. अशी चर्चा आज जयंती दिनानिमित्त भटक्या जमातीतील मसनजोगी समाजातील महिलांसोबत करण्यात आली व आपला पाल्यांना लेकरांना शिकवा अशी चर्चा करण्यात आली. धर्मराज बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड चे प्रकल्प समन्वयक प्रियंका खोब्रागडे, संस्था फेलो अशोक गायकवाड, लक्ष्मी संकोड, अनेक महिला व मुल तसेच मुली उपस्थित होते.

## नायलॉन मांजाची विक्री करणा-याविरुध्द कडक कारवाई करावी....

प्राणीमित्र मिलिंद सोनकांबळे-लातूर :- काही दिवसामधे मकरसंक्रांतीचा सण येत असून संक्रांतीपासून पतंग उडविण्याची प्रथा सुरु होते. विविध माजांचा वापर करुन पतंग उडविली जातात. काही वेळा मांजा गळयात अडकून अपघात होतात, त्यामधे नायलॉन मांजाचा वापर पशु, पक्षांसह माणवासाठी जिवघेणा ठरत आहे त्यामुळे नायलॉन मांजाचा वापर करु नये असे आवाहन पीपल फॉर ॲनिमल्स संस्थेचे अध्यक्ष प्राणीमित्र मिलींद सोनकांबळे यांनी केले आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर येथील खंडपीटात दाखल याचिका क्रं. ०८/२०२० मध्ये न्यायालयाने पतंग उडविण्यासाठी वापरण्यात येणारा नायलॉन मांजा खरेदी करणे, विक्री करणे, साठा करणारे दुकानदार व पतंग उडविण्यासाठी त्याचा वापर करणारे व्यक्ती विरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्याबाबत कळविले आहे. तसेच हरित प्राधिकरणाने २०१७ मध्ये नायलॉन मांजाचे उत्पादन, उपयोग, विक्री यावर बंदी घातली आहे. पतंगबाजीसाठी वापरल्या जाणा-या नायलॉन मांजामुळे मोठया प्रमाणात मानवी व प्राणी, पक्षांची जिवीत हानी होत आहे. नायलॉन मांजाचे उत्पादन, उपयोग, विक्री, वापर यावर कायदेशीर बंदी असताना सुध्दा नायलॉन मांजाचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात आहे. प्राणघातक नायलॉन मांजामुळे अनेक अपघात घडत आहेत. पशु-पक्षांसाठी नायलॉन मांजा जिवघेणा ठरत आहे. नायलॉन मांजाची विक्री, साठा करणा-या विरुध्द कडक करवाई करावी अशी विनंती प्राणीमित्र मिलींद सोनकांबळे यांनी एका निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक, महानगरपालिका आयुक्त यांना केली आहे.

# बौद्धांचे आद्यकर्तव्य आहे की, त्यांनी केवळ रविवारीच नव्हे! तर दररोज बुद्ध विहारात आले पाहिजे. बी. बी. मेश्राम

## ८२ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न.

छत्रपती संभाजी नगर /प्रतिनिधी :- फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने २९ डिसेंबर २०२४ ला संबोधी बुद्ध विहार, अशोक कॉलनी, लासूर स्टेशन येथे ८२ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न झाली.

या कार्यशाळेला उद्घाटनपर मार्गदर्शन करताना आर. बी. नन्नावरे म्हणाले की, आपण शीलवान असले पाहिजे. तो धम्माचा प्राण आहे. करिता माणसाने माणसांशी माणसाप्रमाणे वागले पाहिजे.

याप्रसंगी नंदा पगारे म्हणाल्या की, महिलांनी आपल्या मुलाबाळांसह विहारात आले पाहिजे. जमुना गायकवाड म्हणाल्या की, बाबासाहेब आंबेडकरांमुळे आपणांस बुद्ध कळाले म्हणून किमान रविवारी तरी बुद्ध विहारात आले पाहिजे. लताबाई पठारे म्हणाल्या की, भारताचे संविधान वाचविण्यासाठी सर्वांनीच एकत्रित येऊन लढा दिला पाहिजे. मंदाकिनी थोरात म्हणाल्या की, बाबासाहेबांच्या उपकाराचे ऋण आपण फेडले पाहिजे. परिघाबाई शिरसाठ म्हणाल्या की, बुद्ध, बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याला समजून घेण्यासाठी आपण विहारात गेले पाहिजे. प्रतापराव आमराव म्हणाले की, अनेक दिवसांपासून बोलण्यासाठी संधी मिळेल याची वाट पाहत होतो, पण हिंमत होत नव्हती. तरी स्टडी सर्कलच्या वतीने संधी प्राप्त झाली म्हणून हिंमत झाली आहे. संजय सातदिवे म्हणाले की, आपली माणसे एकत्र येतात पण इतर लोक सोबत येत नसल्याने बहुमत सिद्ध होत नाही. तरी अन्याय अत्याचाराच्या विरोधात एकजुटीने शांततेच्या मार्गाने लढा दिला पाहिजे. बहुतेक नागरिक भारताचे संविधानाविषयी अनभिज्ञ असल्याने ते पूर्वग्रहदुषित भावनेने वागतात. उद्योजक मिलिंद बागूल म्हणाले



की, प्रत्येक रविवारी आपण ही संकल्पना राबविली पाहिजे. अंबादास नरवडे म्हणाले की, ज्या देशात आपला जन्म झाला त्या देशाचे व समाजाचे ऋण आपण फेडले पाहिजे. इंजिनिअर किशोर पाटील म्हणाले की, प्रत्येक रविवारी कुठल्यातरी विहारात गेल्याशिवाय चैन पडत नाही. बाबासाहेब आंबेडकर उशिरा माहीत पडले आहेत. तरी जाग आली तेव्हा सकाळ झाली असे समजून उर्वरीत आयुष्यात शेवटपर्यंत आंबेडकरी चळवळीचे कार्य करूनच प्राण सोडणार आहे. एड. राजू बागूल म्हणाले की, आम्ही भारताचे लोक म्हणून एकत्रित येऊन हक्क अधिकारासाठी संघर्ष केला पाहिजे. महादेव डांबरे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान आपण अंगिकारले पाहिजे.

प्रमुख वक्ते अनिल जाधव ऊर्फ बापुजी म्हणाले की, भारतीय बौद्ध महासभा, भिक्खू संघ यांनी आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे. धम्माची चळवळ गतिमान करण्यासाठी आपण प्रबोधनात्मक कार्य केले पाहिजे.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, विहारात पाली भाषेत म्हटलेल्या वंदना व इतर गाथेचा लोकभाषेत अर्थ समजावून सांगितला पाहिजे. मुलांवर बालवयात संस्कार व्हावेत म्हणून सत्येंद्र तेलतुंबडे यांनी नर्सरी व पूर्व प्राथमिक शिक्षणाचा धम्मानुसार आराखडा राबविण्याची योजना आखली आहे. त्याची अंमलबजावणी आपल्या विहारात करावी. आपली सत्ता यावी असे सर्वांना वाटत असले तरी सत्ता येण्यासाठी ज्या अटी व शर्थीची पूर्तता करावी लागते, ते करायला कुणी तयार नाहीत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, केवळ निवडणुका जिंकणे एवढेच राजकीय पक्षाचे काम नसून त्यांनी जनतेला त्यांचे हक्क अधिकार मिळवून देण्यासाठी संघटीत व्हावे म्हणून संघर्ष करायला लावले पाहिजे. करिता प्रबोधनात्मक कार्यक्रम राबविले पाहिजेत. आपल्या विहाराच्या भिंतीवर दहा सदस्यांची कार्यकारिणी व अकरा सदस्यांचे सल्लागार मंडळ निवडल्याचे नमूद केले आहे. तर मग हे सल्लागार मंडळ त्या कार्यकारीणीला काय सल्ला देतात? त्याची अंमलबजावणी कशी केली जाते? यावर सर्व सदस्यांनी सतर्क राहिले पाहिजे. जेणेकरून विहारे ही चळवळीची संस्कार केंद्रे म्हणून उदयास आली पाहिजेत.

आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वप्नातील भारतीय समाज निर्माण करण्यासाठी समाजात लोकशाहीची अंमलबजावणी केली पाहिजे. करिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २२ डिसेंबर १९५२ ला पुण्यातील डिस्ट्रीक्ट लॉ लायब्ररीत दिलेल्या संदेशाप्रमाणे लोकशाहीच्या पूर्वावर्ती शर्थी पूर्ण करण्यासाठी आपण कार्यप्रवण झाले पाहिजे. जीवनाचा अविभाज्य भाग म्हणून आपण आपल्या दररोजच्या वैयक्तिक जीवनात, कुटुंबात, संस्थेत, संघटनेत, समाजात लोकशाहीची अंमलबजावणी केली पाहिजे. करिता या अनुषंगाने चर्चा करण्यासाठी केवळ रविवारीच नव्हे! तर बौद्धांनी दररोज विहारात आलेच पाहिजे. म्हणून कुलुपबंद विहारे उघडी ठेवली पाहिजेत.

या कार्यशाळेचे प्रास्ताविक एड. विलास रामटेके व सुत्रसंचालन महादेव डांबरे यांनी केले. या कार्यशाळेला बी. बी. मेश्राम, उद्योजक मिलिंद बागूल, महादेव डांबरे, एड. राजू बागूल, इंजिनिअर किशोर पाटील, चंद्रभान पवार, शामराव बागूल, जगजीवन सातदिवे, मिलिंद साळवे, प्रताप आमराव, दगडू गजहंस, अंबादास नरवडे, पंडित शिरसाठ, उत्तमराव शिनगारे, रंजना नन्नावरे, लताबाई पठारे, जमुना गायकवाड, नंदा पगारे, मंदाकिनी थोरात, आशाताई गायकवाड, आर. बी. नन्नावरे, अनिल जाधव, मंगल पठारे, तन्वी पठारे, पी. बी. शिरसाठ, सुनिल दुशिंग, संजय सातदिवे, भिमराव त्रिभुवन, मनोहर त्रिभुवन इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आर. बी. नन्नावरे यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यशाळा हर्षो ल्हासात संपन्न झाली.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE